**वाचा** :- १)म.मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद, नाशिक यांचेकडील ज्ञापन आरोग्य/अस्था३/५५/२०१३ दि.२/२/२०१३
२) म.मु.का.अ जि.प.नाशिक यांचेकडील चौ अधि.नेमणुक आदेश क्रमांक आरोग्य/अस्था३/२८७/२०१३ दि.२०/७/२०१३
३) सहा.आयुक्त(चौकशी),नाशिक विभाग नाशिक यांचेकडील पत्र क्र.विशा-४/खाचौ/सीआर-२२१/२०१४ दि १७/१/२०१४
४) म.मु.का.अ जि.प.नाशिक यांचेकडील यांचेकडील चौ अधि.ने.आदेश क्रमांक आरोग्य /अस्था३/१०३/१४ दि.१९/३/१४
५)या कार्या.जा.वै.प्रमाणपत्र नसलेने दिलेली का.दा.नो क्रमांक आरोग्य/अस्था४/१०४७-१०६३/१६ दि.१८/१०/२०१६
६) या कार्या.कारणे दाखवा नोटीस ०२ क्र आरोग्य/अस्था५/१२३२/२०१६ दि.२१/१२/२०१६
७) या कार्यालयाची अंतिम कारणे दाखवा नोटीस ०३ क्र आरोग्य/अस्था५/१७२/२०१७ दि.२०/१/२०१७ दि.२०/२/१७
८) या कार्या.आरोग्य/अस्था३/२४५/२०१७ दि.६/७/२०१७ वर्तमानपत्रात (दिव्य मराठी व म.टाईम्स)जाहीर नोटीस
९) या कार्यालयाची मंजुर टिपणी दिनांक :- १६ / ८ /२०१७

---

**नाशिक जिल्हा परिषद, नाशिक**
जा.क्र.आरोग्य/अस्था३/५२/२०१७
नाशिक दिनांक: १८ / ८ /२०१७

**आदेश**

त्याअर्थी श्री.आर.व्ही.पावरा,औ.नि.अधिकारी,प्रा.आ.केंद्र शिरसगाव ता.त्र्यंबकेश्वर येथे कार्यरत असताना दि.०१/१२/२००८ ते १५/९/२००९ आणि दि.२२/१२/२००९ पासुन आजपोवतो कामी अनधिकृत गैरहजर आहेत.कामी अनधिकृत गैरहजर असल्याने ज्ञापन क्र.आरोग्य/अस्था३/५५/२०१३ दि.०२/०२/२०१३ अन्वये श्री.पावरा,औ.नि.अधिकारी यांचेविरुद्ध खालीलप्रमाणे खातेचौकशी सुरु करण्यात आली.

**१) कोणत्याही प्रकारचे रजेचे आवेदन न देता कामी अनधिकृत गैरहजर राहणे, वारंवार गैरहजर राहुन शासकीय कामाकाजात अडथळा निर्माण करणे ,कामकाजात हलगर्जीपणा करणे,जनतेला आरोग्य सेवेपासुन वंचित ठेवणे,**

ज्याअर्थी प्रस्तुत ज्ञापन व परिशिष्ट १ ते ४ हे बजाविणे कामी श्री.पावरा औ.नि.अधिकारी यांचा पत्ता सापडु शकला नसल्याने तसेच सदर ज्ञापनाचा खुलासा सादर केलेला नसल्याने प्रस्तुत प्रकरणी महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (शिस्त व अपील)नियम १९६४ चा नियम ६ (३) नुसार मा.मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद नाशिक यांचे कडील आदेश क्र आरोग्य /अस्था३/२८७/१३ दि.२०/७/१३ अन्वये सहाय्यक आयुक्त (चौकशी) नाशिक विभाग नाशिक यांची नेमणुक करणेत आलेली होती.

ज्याअर्थी सहाय्यक आयुक्त (चौकशी) नाशिक विभाग नाशिक यांनी पत्र क्र.विशा-४/खाचौ/सीआर-२२१/२०१४ दि.१७/१/२०१४ अन्वये कळविणेत आले की,सदर खातेचौकशी प्रकरणी सादरकर्ता अधिकारी तसेच अपचारी श्री,पावरा,हे सुनावणी करीता गैरहजर राहील्याने त्यांच्या चौकशीकामी सततच्या गैरहजर प्रकरणी निर्णय घेणे शक्य नसल्याने त्यांनी सदरची मुळ नस्ती या कार्यालयास परत केली,म्हणुन पुनश्चः महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (शिस्त व अपील)नियम १९६४ चा नियम ६ (३) नुसार मा.मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद नाशिक यांचे कडील आदेश क्र आरोग्य /अस्था३/१०३/२०१४ दि.१९/३/२०१४ अन्वये श्री.रविंद्र परदेशी,गटविकास अधिकारी ,पं.स.नाशिक यांची चौकशी अधिकारी म्हणुन नेमणुक करणेत आली .

ज्याअर्थी चौकशी अधिकारी यांनी अपचारी यांना दि.०१/०४/२०१५ रोजीचे पत्रान्वये दि.९ एप्रील २०१५ रोजी दुपारी १२ वा पंचायत समिती नाशिक यांचे दालनात उपस्थित राहणेबाबत कळविणेत आले होते.तत्राप सदर सुनावणी करीता श्री.पावरा हे गैरहजर राहीले असल्याचे कळविणेत आले होते. सदर खातेचौकशीचा निर्णय घेणेकामी दि.६/७/२०१७ रोजीच्या पत्रान्वये दैनिक वर्तमानपत्रात (दिव्य मराठी व महाराष्ट्र टाईम्स) दि.९/७/२०१७ रोजी श्री.पावरा, औ.नि.अधिकारी हे कामी अनधिकृत गैरहजर राहील्याने त्यांना सेवेतुन बडतर्फ का करणेत येवु नये याबाबत जाहीर नोटीस देणेत आलेली होती सदर नोटीसीचा खुलासा ७ दिवसाचे आत मागविणेत आला होता.तत्राप सदर जाहीर नोटीसीचा खुलासा या कार्यालयास अदयाप अप्राप्त आहे.

ज्याअर्थी श्री.पावरा औ.नि.अधिकारी यांची निवड अनुसुचित जमाती प्रवर्गातुन झालेली आहे. त्यांनी जातवैधता प्रमाणपत्र सादर केलेले नसल्याने त्यांना सेवेतुन बडतर्फ करणेत येईल अशी नोटीस महाराष्ट्र अनुसुचित जाती,अनु.जमाती विमुक्त जाती भटक्या जमाती इतर मागासवर्ग अधिनियम २००० व महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग शा परि.क्र बीसीसी २०१२ /प्रक्र ३३२/१२/१६ ब दि.१८ मे २०१३ अन्वये संदर्भ क्र ६ ते ८ अन्वये काढणेत आली होती तत्राप श्री पावरा, हे कामी गैरहजर असल्याने सदर नोटीस बजाविणेत आली नाही.

त्याअर्थी श्री.पावरा औ.नि.अधिकारी हे कामी सन २००८ पासुन वारंवार गैरहजर असुन ते जि.प. व पं.समिती तसेच शेवटी कार्यरत असलेले प्रा.आ.केंद्र शिरसगाव ता.त्र्यंबकेश्वर येथे दि.१२/२/२०१३ पासुन कोणत्याही स्वरुपात लेखी वा समक्ष हजर झालेले नाहीत.जिल्हा परिषद सेवेची गरज नाही असे गृहीत धरुन महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा शिस्त व अपील नियम १९६७ चे नियम ३ चे व महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम १९८१ चे नियम १० चा भंग केल्याचे सिद्ध होत असल्याने तसेच महाराष्ट्र अनुसुचित जाती,अनु.जमाती विमुक्त जाती भटक्या जमाती इतर मागासवर्ग अधिनियम २००० व महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग शा परि.क्र बीसीसी २०१२ /प्रक्र ३३२/१२/१६ ब दि.१८ मे २०१३ अन्वये संदर्भ क्र ६ ते ८ अन्वये श्री.आर.व्ही पावरा,औषध निर्माण अधिकारी यांना सदर प्रकरणी शासन होणेबाबत नियुक्ती प्राधिकारी या नात्याने माझे अंतिम मत झाल्याने मी.मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद नाशिक **महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ चे भाग - दोन नियम ४(७) नुसार प्राप्त अधिकाराचा वापर करुन श्री.आर.व्ही पावरा,औ.नि.अधिकारी यांना जिल्हा परिषद नाशिकच्या सेवेतुन बडतर्फ करणेची शिक्षा देत आहे.**

प्रस्तुत आदेशाची नोंद श्री.पावरा,औषध निर्माण अधिकारी यांचे मुळसेवापुस्तकात घेण्यात यावी.

Deepa 6/08

**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद नाशिक**

प्रति,

श्री.आर.व्ही,पावरा,औषध निर्माण अधिकारी,प्रा.आ.केंद्र शिरसगाव ता.त्र्यंबकेश्वर

व्दाराः- गटविकास अधिकारी पंचायत समिती त्र्यंबकेश्वर

प्रतः- गटविकास अधिकारी पंचायत समिती त्र्यंबकेश्वर

२/- समवेत आदेशाच्या ३ प्रती जोडलेल्या असुन त्यापैकी १ प्रत श्री.पावरा औ.नि.अधिकारी यांना बजावून दुसऱ्या प्रतीवर दिनांकित स्वाक्षरी घेऊन सदरची प्रत इकडेस सादर करावी.

प्रतः- अस्थापना विभाग -३ ,आरोग्य विभाग जि.प.नाशिक

Sd xxx

मुख्य कार्यकारी अधिकारी,

जिल्हा परिषद नाशिक